**तहसीलदार ठाणे**

**तहसीलदार कार्यालय ठाणे, ठाणे स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम), तालुका ठाणे, जि.ठाणे**

**पिन कोड : ४०० ६०१ दुरध्वनी क्रमांक ०२२ २५३३११६४**

---

क्र.महसुल/क-१/टे-२/जमिनबाब/कावि-५९/२०१९ दिनांक: २७/०६/२०१९

प्रति,
मा.सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : Kausa-Mumbra Mangrove destroyed

संदर्भ : श्री.फकरुद्दीन खान यांचा दिनांक १५/०२/२०१९ रोजी ई-मेल द्वारे प्राप्त अर्ज

सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५/०५/२०१९ रोजी स्थळपाहणी निश्चित करणेत आलेली होती. मात्र अर्जदार यांचा पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक अर्जात नमुद नसल्यामुळे तक्रारदार यांना स्थळपाहणीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविता आलेले नाही.

प्रकरणी या कार्यालयाकडील नायब तहसीलदार (महसुल), मंडळ अधिकारी मुंब्रा व तलाठी सजा मुंब्रा, दिवा यांनी प्रभाग अधिकारी मुंब्रा व बंदर निरीक्षक ठाणे यांचे समवेत अर्जात नमुद जागेची प्रत्यक्ष पाहणी केली असता तक्रारीत नमुद मौजे कौसा येथील शिमलापार्क एम.एम.व्हॅलीच्या मागील बाजूस कांदळवन तोडल्याबाबत अथवा ऱ्हास केल्याबाबत आढळुन आलेले नाही.

याबाबत मंडळ अधिकारी मुंब्रा यांचेकडील स्थळपाहणी अहवाल, जागेवर केलेला पंचनामा, व Geo tagging चे फोटोसह अहवाल सादर करीत आहोत.

Received
27/06/2019

(अधिक पाटील)
तहसीलदार ठाणे

प्रत : मा.जिल्हाधिकारी, ठाणे (महसुल शाखा) यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

क्र./जा. बा. क्र. / ६४२ / २०१९
मंडळ अधिकारी मुंब्रा यांचे कार्यालय
दिनांक १५ / ०५ / २०१९

प्रति;
मा. तहसिलदार सो ठाणे

विषय -: कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या नविन प्राप्त तक्रारी....

संदर्भ -: आपलेकडील पत्र क्र. महसूल/क-१/टे-२ जमिनबाब/कावि-११०३/२०१९ दि. ०८/०५/१

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये अहवाल सादर करण्यात येते कि आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये आज दि. १५/०५/२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता तक्रारदार श्री. फख्रुद्दीन खान यांनी मौजे कौसा-मुंब्रा येथील शिमला पार्क एम. एम. व्हॅली मागील बाजूस कांदळवनाची ऱ्हास होत असल्याबाबत मा. जिल्हाधिकारी सो ठाणे यांचेकडे तक्रारी अर्ज केला आहे सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने आपलेकडील संदर्भिय पत्रान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती सदस्य श्री. नंदकिशोर देशमुख, ना. तहसिलदार (महसूल) ठाणे, श्री. रविंद्र काळे, प्र. मंडळ अधिकारी मुंब्रा, श्री. धनंजय वलारी, तलाठी मुंब्रा, श्री. डी. जी. खानसोळे, तलाठी दिवा, श्री. गावडे, प्रभाग अधिकारी मुंब्रा, श्री. जाधव, बंदर निरिक्षक ठाणे यांचे समवेत जागेवर प्रत्यक्ष पहाणिसाठी उपस्थित होतो. परंतू तक्रारदार श्री. फख्रुद्दीन खान हे दिलेल्या वेळेत जागेवर उपस्थित नसल्याने तक्रारीत नमूद मौजे कौसा येथील शिमला पार्क एम. एम. व्हॅलीच्या मागील बाजूस जागेचे प्रत्यक्ष स्थळपहाणी केली.

सदर जागेवर आज रोजी कांदळवन तोडल्याबाबत अथवा ऱ्हास केल्याबाबत आढळून आलेले नाही. सदर बाबत पंचनामा केला असून सोबत छायाचित्र जोडत आहे. पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्र. मंडळ अधिकारी मुंब्रा
ता. जि. ठाणे

पंचनामा

नायब तहसिलदार (महसूल) ठाणे

यांचेसमक्ष

आम्ही खालील सह्या करणारे पंचलोक समक्ष हजर राहुन विचार केल्यावरुन पंचनामा लिहून देतो की, आज दि. १५।०५।२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता तक्रारदार श्री. फखरुद्दीन खान यांनी मौजे कौसा, मुंब्रा येथील शिमला पार्क एम. एम. व्हॅली मागील बाजूस कांदळवनाची ऱ्हास होत असल्याबाबत मा. जिल्हाधिकारी सो ठाणे यांचेकडे तक्रार केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मा. तहसिलदार सो ठाणे यांचेकडील पत्र क्र.- महसूल/क-१/टे-२/जमिनबाब/कावि- ११०३/२०१९ दि. ०९/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती सदस्य श्री. नंदकिशोर देशमुख, ना. तहसिलदार (महसूल) ठाणे, श्री. रविंद्र काळे, प्र. मंडळ अधिकारी मुंब्रा, श्री. धनंजय वलारी, तलाठी मुंब्रा, श्री. डी. जी. खानसोळे तलाठी दिवा, श्री. गावडे, प्रभाग अधिकारी मुंब्रा, श्री. जाधव बंदर निरिक्षक ठाणे यांचे समवेत जागेवर प्रत्यक्ष पहाणीसाठी उपस्थित होते. परंतू तक्रारदार श्री. फखरुद्दीन खान हे दिलेल्या वेळेत जागेवर उपस्थित नसल्याने तक्रारीत नमूद मौजे कौसा येथील शिमला पार्क एम. एम. व्हॅलीच्या मागील बाजूस जागेची प्रत्यक्ष पहाणी केली असता जागेवर आज रोजी कांदळवन तोडल्याबाबत अथवा ऱ्हास केल्याबाबत आढळून आलेले नाही. तरी सदरचा पंचनामा आम्ही कांदळवनाच्या ऱ्हास होण्याबाबतच्या स्थळपहाणीकामी प्रत्यक्ष हजर राहून विचारे वरुन लिहून देतो. सोबत स्थळपहाणीबाबतचे सद्यःस्थितीतील छायाचित्र जोडलेले आहेत.

करिता हा पंचनामा आज दि. १५।०५।२०१९ रोजी लिहून दिला आहे.

समक्ष

पंचाच्या सह्या

१) शाह आलम शाहीद आजमी - [signature] 7977468843

2) मंगेश रमेश वाघ - मंगेशवाघ 7208102561

३) संजय पाऊ हावळे [signature] 8928960172


[signature]
मं. अ. मुंब्रा


Network: 15 May 2019 12:47:43 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:47:41 GMT+05:30


Network: 15 May 2019 12:46:42 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:46:41 GMT+05:30


Network: 15 May 2019 12:47:47 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:47:46 GMT+05:30


Network: 15 May 2019 12:47:53 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:47:52 GMT+05:30


Network: 15 May 2019 12:49:14 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:49:13 GMT+05:30


Network: 15 May 2019 12:49:16 GMT+05:30
Local: 15 May 2019 12:49:14 GMT+05:30